//०८//

**वादीतर्फे श्री.के.व्ही.बेंडकुळे वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.**

**०९.** मी लक्ष्मण बापुराव येमले, रा. गुंजोटी यांना ओळखतो. मी पठाण मुजमील अहमदखान यांना ओळखतो. मी तुकाराम राम भदाडे यांना ओळखतो. भागिरथीबाईचा भाऊ बाबुराव शिरसाठ याला मी ओळखत नाही. मंचक बोंडगे यांना भागिरथीबाई चाटे यांनी खरेदीपत्र करुन दिले. हे खरे की, त्या खरेदीपत्रावर लक्ष्मण चाटे, लक्ष्मण चेमले, मी, मुजमील पठाण व तुकाराम भदाडे यांच्या साक्षीदार म्हणून सहया आहेत. नि.क्र.९५/१ या खरेदीपत्रामध्ये नमूद जमिनीच्या उत्तरेकडे भागिरथीबाई यांचे २२ प्लॉट आहेत, याबद्दल मला माहिती नाही. सरतपास परिच्छेद क्र.५ मध्ये ओळ क्र.२ मध्ये स.क्र.२६१/३/४ च्या उत्तरेस वादीचे काही प्लॉटस अस्तीत्वात आहे, असा उल्लेख आहे, तो उल्लेख खरा नाही. रुपाबाई गित्ते यांना मी ओळखत नाही. रुपाबाई गित्ते हिला भागिरथीबाई हिने प्लॉट क्र.१९ चे खरेदीपत्र करुन दिले हे मला माहिती नाही. (भागिरथीबाई हिने विकलेल्या प्रत्येक प्लॉटवर साक्षीदार म्हणून लक्ष्मण चाटे यांची सही आहे या प्रश्नास प्रतिवादीतर्फे हरकत घेण्यात आली की, त्या अनुषंगाने वाद कथन नाही. वादपत्र वाचता त्यामध्ये तसा उल्लेख नाही. त्यामुळे, सदर प्रश्न थेट स्वरुपात विचारता येणार नाही.)

**१०.** भागिरथीबाई यांनी अनेक खरेदीपत्रे गट क्र.२६१/३/४ ची करुन दिली याबद्दल मला माहिती नाही. माझ्या खरेदीपत्रावर लक्ष्मण चाटे किंवा त्याचा भाऊ ज्ञानोबा यांची सही नाही, हे खरे आहे. मी करुन घेतलेल्या खरेदीपत्रावर किनगांव येथील राम शिंदे, श्री. रोडे यांच्या साक्षीदार म्हणून सहया आहेत. नंदकुमार रोडे हे अहमदपूर येथील रहिवाशी आहेत. हे खरे आहे की, रोडे आणि शिंदे हे दस्त करुन देणाऱ्या व्यक्तीला ओळखतात अशा आशयाचे साक्षीदार आहेत. दस्ताचे साक्षीदार पुन्हा राम दत्तात्रय शिंदे आणि मनोहर दगडु मुरकुटे हे आहेत यास माझे सांगणे की, मी मनोहर मुरकुटे याला ओळखत नाही. सदर

खरेदीपत्र करुन देताना भागिरथीबाईसोबत तिच्या घरातील किंवा गावातील कुणीही व्यक्ती नव्हते, हे खरे नाही. मी सांगतो की, लक्ष्मण चाटे, तुकाराम भदाडे हे त्यावेळी हजर होते. लक्ष्मण चाटे व तुकाराम भदाडे यांच्या सहया या खरेदीपत्रावर नाहीत, हे खरे आहे. त्यांच्या सहया या खरेदीपत्रावर नाहीत कारण त्यांनी सहया केल्या नाहीत. स.क्र.२६१/२/३ या जमिनीतील सदर खरेदीपत्रातील जागा आहे. खरेदीपत्रातील जागा पुर्व-पश्चिम २९.५ व दक्षिण -उत्तर १३७ फुट आहे. खरेदीचा ठराव हा कधी झाला हे मला आठवत नाही. तोंडी करार झाला व चेक दिला, त्यानंतर दोन महिन्यांनी खरेदीपत्र झाले. हे खरे की, खरेदीपत्रात धनादेशाचा उल्लेख नाही. हे खरे की, खरेदीपत्रामध्ये ३,३५,०००/- रुपये यापुर्वीच मिळाले असा उल्लेख आहे. सरतपास परिच्छेद क्र.२ मध्ये दहा लाख रुपये मोबदल्यात दि.०८/०४/२०१५ रोजी तोंडी कराराआधारे विक्री केली असा उल्लेख खरेदीपत्रात नाही, हे खरे आहे. शपथपत्रातील या अनुषंगाचा मजकुर आणि मी आता सांगितलेला मजकुर असे दोन्ही खरे आहेत.

**११.** भागिरथीबाईचे आमच्या उत्तरेला प्लॉट आहेत. प्लॉट क्र.१७ याच्यासाठी मंचक बोंडगे यांच्याशी भागिरथीबाईचा ठराव झाला होता, हे खरे नाही. दि.२२/०६/२०१५ रोजी रक्कम रुपये सात लाख मोबदल्याचा हा ठराव झाला, हे खरे नाही. दि.२२/०६/२०१५ रोजी मी, भागिरथीबाई, तिचा मुलगा लक्ष्मण, बाबुराव सिरसाठ, तुकाराम भदाडे असे सगळे अहमदपूर येथे खरेदीपत्र करण्यासाठी आलो, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, अहमदपूर येथे येवून प्लॉट क्र.१७ साठी खरेदीपत्र लिहिण्यात आले व त्यामध्ये मी, बाबुराव, तुकाराम, लक्ष्मण व भागिरथीबाई यांचा उल्लेख आहे. तुकाराम भदाडे हा मयत आहे. हे खरे की, ते चाटेवाडीतील रहिवाशी होते. हे खरे नाही की, अहमदपूर येथे येवून प्लॉट क्र.१७ च्या खरेदी व्यवहारासाठी मुद्रांक खरेदी करुन त्याचे लिखाण झाले. हे खरे नाही की, मी, बाबुराव, तुकाराम, लक्ष्मण व भागिरथीबाई यांनी त्यावर वाचून सहया केल्या. दि.२२/०६/२०१५ रोजी सदर दस्त नोंदवण्यासाठी दुय्यम निबंधक

कचेरीत दाखल ही करण्यात आला, मात्र संगणकात बिघाड झाल्याने तो दस्त त्या दिवशी झाला होता यास माझे सांगणे की, त्या दिवशी संगणक बंद होता. संगणक बंद असल्याने आम्ही परत आलो, हे खरे आहे. मी सांगतो की, त्या दिवशी बाबुराव गैरहजर होते.

**१२.** त्यानंतर दि.२५/०६/२०१५ रोजी मी, मंचक बोंडगे आणि भागिरथीबाई पुन्हा अहमदपूरला आलो यास माझे सांगणे की, मंचक बोंडगे आमच्यासोबत नव्हते. दि.२२/०६/२०१५ रोजीचा दस्त मंचक बोंडगे याच्याकडे होता, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, भागिरथीबाईला फसवुन दि.२२/०६/२०१५ चा दस्त सांगून अन्य माझ्या हक्कातील दस्त तयार करुन घेतला. भागिरथीबाईला फसवुन, भूल थापा देवून दि.२५/०६/२०१५ रोजी नवीन दस्तावर तिच्या सहया घेतल्या, हे खरे नाही. हे खरे नाही की, प्लॉट क्र.१७ चे खरेदीपत्र करुन घेतो असे भागिरथीबाईला खोटे सांगून मी वाद मिळकतीचा दस्त तिच्याकडून करुन घेतला. त्याचवेळेला पैसे दिले व कब्जा घेतला असे मी खोटे सांगतो, हे खरे नाही. कब्जा दिला म्हणजे लक्ष्मण चाटेने मला मोजून प्लॉट दिला. तुकाराम भदाडे याच्यासमोर त्याने हा प्लॉट मोजून दिला. तुकाराम भदाडे मयत आहे. बाकी कोणीही साक्षीदार नाही. हे खरे नाही की, या प्लॉटचा कब्जा मला दिलेला नाही व आजही तेथे भागिरथीबाई व तिची मुले राहतात. मी प्लॉट घेतल्यानंतर त्याबद्दल वाद सुरु झाले, हे खरे आहे. हे खरे की, पोलीस ठाण्यात माझ्याविरुध्द अर्ज देण्यात आला आणि माझ्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला. भागिरथीबाईने हा दावा दाखल केल्यावर माझ्याविरुध्द मी प्लॉटची विक्री करु नये म्हणून मनाई आदेश मागितला होता याची मला माहिती नाही. दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांनाही भागिरथीबाईने वादग्रस्त प्लॉट संबंधीत व्यवहार करु नये असा अर्ज दिला होता, याची मला माहिती नाही. वर्तमानपत्रात या अनुषंगाने तिने जाहीर नोटीसही प्रसिध्द केली, याची मला माहिती नाही. माझा या वाद मिळकतीत कब्जा

व मालकी हक्क नसताना मी त्याचे खरेदीपत्र नागरगोजे यांच्या लाभात करुन दिले, हे खरे नाही. पाच लाख रुपयांच्या मोबदल्यात मी हा प्लॉट जयवंत नागरगोजे यांना करुन दिला. हे खरे की, या प्लॉटच्या जयवंत नागरगोजेच्या खरेदीपत्रात मोबदल्याचा उल्लेख २,८०,०००/- रुपये असा आहे. हे खरे की, त्यात २,८०,०००/- रक्कमेचा धनादेश जयवंतने मला दिल्याचा उल्लेख आहे. मी सांगतो की, मला पाच लाख रुपयाचा चेक दिला व ते पैसे मला मिळाले. जयवंतच्या खरेदीपत्रामध्ये मी एक घोषणापत्र करुन दिलेले आहे, हे खरे आहे. त्या घोषणापत्रात या विक्री मिळकतीसंदर्भात कुठल्याही न्यायालयात दावा प्रलंबित नाही, त्याबद्दल करार झाले नाहीत, किंवा कोणतेही वाद प्रलंबित नाहीत अशा आशयाचा उल्लेख आहे. ते घोषणापत्र खोटे आहे याबद्दल मला काही समजत नाही. वादग्रस्त मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही, हे खरे आहे. त्या प्लॉटवर माझा व जयवंतचा कब्जा नाही यास माझे सांगणे की, जयवंतचा कब्जा आहे. हे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीचे बेकायदेशीर खरेदीपत्र मी करुन दिले आहे. वादग्रस्त मिळकती शेजारच्या प्लॉटचा मंचक बोंडगे याने दस्त केला आहे, हे खरे आहे. हे खरे की, तो प्लॉट व वादग्रस्त प्लॉट एकमेकांलगत आहेत. हे खरे की, ते दोन्ही प्लॉट अहमदपूर-अंबाजोगाई रस्त्याच्या लगतचे आहेत. या प्लॉटची किंमत कोटयावधी रुपये आहे. मंचक बोंडगे माझे काका आहेत, हे खरे नाही. आम्ही दोघांनी संगनमत करुन सदर प्लॉट बळकावण्याचा प्रयत्न केला, हे खरे नाही. हे खरे नाही की, मंचक बोंडगे याने घेतलेल्या प्लॉटचा बैनामा विश्वासू स्वरुपाचा आहे. मी सांगतो की, ते खरेदीपत्र आहे. भागिरथीबाईचे वय मला सांगता येत नाही. तिचे वय ८५ ते ८६ वर्षे आहे, याबद्दल मला माहिती नाही. तिला लिहिता-वाचता येत नाही याची मला माहिती नाही. खरेदीपत्रावर तिचा अंगठा आहे. तिला व्यवस्थीत ऐकू येत नाही, याची मला माहिती नाही. भागिरथीबाईला फसवुन १७ क्रमांकाचे प्लॉटचे खरेदीपत्र आहे असे भासवून गावातील कोणीही व्यक्ती हजर नसताना हा व्यवहार केला, तो रद्द होणे योग्य आहे, हे खरे नाही. जयवंत नागरगोजे मुंबईत

राहतो. हे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा कब्जा नव्हता व जयवंतचाही नाही. हे खरे नाही की, माझे खरेदीपत्र रद्दबातल होण्यास व जयवंतचे खरेदीपत्र वादीवर बंधनकारक नाही असे ठरविण्यास पात्र आहे. हे खरे नाही की, सरतपासातील मजकुर चुकीचा व खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक:२८/०४/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**